# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

दुपार

**दिनांक ०२.०६.२०२६ मंगळवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०१.०६.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०७ केसेसमध्ये ०७ ईसमांवर कारवाई करून २,३७,९९,४७१/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०२ केसेसमध्ये ०२ ईसमांवर कारवाई करून १८,१५०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,३८६ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,५६,६००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) जरीपटका पोलीसांची कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द कारवाई सुरू आहेत.

दिनांक ०१.०६.२०२६ चे २०.३० वा. ते २२.२० वा. चे दरम्यान, जरीपटका पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, त्यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, छाया प्रोव्हीजन समोर, नारा गांव, सार्वजनिक रोडवर एन.डी.पि.एस कायद्याचे तंतोतंत पालन करून, पंचासमक्ष एका संशयीतास थांबवुन त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने आपले नांव आयुष उर्फ चांदी अमृत मेश्राम, वय २१ वर्षे, रा. फोंडेकर चे घरी किरायाने, नारा गांव, जरीपटका, नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यातुन झिपलॉक पन्नीत एकुण १३ ग्रॅम एम.डी. पावडर किंमती अंदाजे १,३०,०००/— रू. ची मिळुन आली. आरोपीचे ताब्यातुन एम.डी. पावडर, मोबाईल फोन असा एकुण १,५०,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीची सखोल विचारपूस केली असता, त्याने त्याचे साथिदार पाहिजे आरोपी क्र. १) मजहर अली अकबर अली, रा. टेका नाका, नागपुर २) प्रथम उर्फ भुऱ्या सुरेश डोंगरे, रा. मानकापुर, नागपुर ३) आदर्श अशोक मिश्रा, रा. ओम नगर, नागपुर ४) सरफराज शेख उर्फ सप्पुडॉन, रा. कपीलनगर, नागपुर यांचे मदतीने एम.डी. पावडर आणल्याचे सांगीतले. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क), २२(ब), २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे जरीपटका

येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्रीमती विनिता साहु अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. डॉ. संदीप पखाले, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. सत्यविर बंडीवार सहा. पोलीस आयुक्त (जरीपटका विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. अनिल ताकसांडे, पोउपनि. सुनिल गोरडे, पोहवा. शेख ईमरान व त्यांचे पथकाने केली.

**३) पाचपावली पोलीसांची कामगिरी :— अग्नी शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०२.०६.२०२६ चे ०४.३० वा. चे सुमारास, पाचपावली पोलीसांचे तपास पथकाने गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, पोलीस ठाणे हद्दीत मेहंदीबाग कॉर्नर, पॉवर हाऊस मागे, रेल्वे लाईन जवळ, नागपुर येथे एका संशयीत ईसमास ताब्यात घेतले. त्यास पंचासमक्ष त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव मयुर किशोर आडतीया, वय २२ वर्षे, रा. पांगे मोहल्ला, बाहुली विहीरी जवळ, लालगंज, शांतीनगर, नागपुर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे कमरेत एक विदेशी बनावटीचे अग्नीशस्त्र (माउजर) मॅग्झीनसह व ०१ जिवंत काडतुस असा एकुण किंमती २६,०००/—रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने जप्त करण्यात आला. आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने अग्नीशस्त्र बाळगुन मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे पाचपावली येथे आरोपीविरूध्द कलम ३, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राहुल मदने पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ३), मा. श्री. शिवप्रसादर पारवे, सहा. पोलीस आयुक्त (लकडगंज विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. अनिरूध्द पुरी, सपोनि. प्रमोद सोनवणे, पोहवा. मुकेश यादव व त्यांचे सहकाऱ्यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे नविन कामठी :— हद्दपार ईसमास अटक.**

दिनांक ०२.०६.२०२६ चे ०७.४० वा. चे सुमारास, नविन कामठी पोलीसांनी मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, पोलीस ठाणे हद्दीत जयस्तंभ चौक, कामठी येथे प्राप्त वर्णनाचा एक ईसम दिसल्याने, त्याचे जवळ जात असता, तो पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेवुन, त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव शेख सलमान उर्फ अब्बु वल्द शेख हुसेन, वय २८ वर्षे, रा. चित्तरंजन नगर, अब्दुल शहा दर्गाह जवळ, कामठी, जि. नागपूर असे सांगीतले. आरोपीचा अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परीमंडळ क्र. ०६ यांचे हद्दपार आदेश क्र. ०७/२०२६, दिनांक २२.०४.२०२६ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे नविन कामठी येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे पाचपावली :— प्रतिबंधीत तंबाखूजन्य पदार्थ बाळगणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

मा. श्री. रविंद्रकुमार सिंघल पोलीस आयुक्त नागपुर शहर यांचे आदेशान्वये व मार्गदर्शनात संपुर्ण नागपुर शहरात मादक पदार्थ बाळगणारे व विक्री करणारे आरोपी विरोधात **''ऑपरेशन थंडर''** राबविण्यात येत आहे.

दिनांक ०१.०६.२०२६ चे १३.०० वा. ते १८.०० वा. चे दरम्यान, पाचपावली पोलीसांनी अन्न सुरक्षा अधिकारी यांचेसह पोलीस ठाणे हद्दीत, प्लॉट नं. ८२, आझाद बुनकर कॉलोनी, अशोक नगर, पाचपावली, नागपुर येथे राहणारा आरोपी नामे अजहर इकबाल अतीकुर रेहमान कुरेशी, वय ४५ वर्षे याचे राहते घरी पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, आरोपी हा त्याचे ताब्यात शासनाने प्रतीबंधीत केलेला सुगंधीत तंबाखु, पानमसाला वेगवेगळ्या कंपनीचा व फ्लेवरचे तंबाखु पाऊच विक्री करीता बाळगुन मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन एकुण ४१९ कि. ७६६ ग्रॅ. वजनी प्रतीबंधीत तंबाखु, पानमसाला किंमती ५,९९,२७२/—रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता शासनाने प्रतिबंधीत तंबाखुजन्य पदार्थ व सुगंधीत पानमसाला बेकायदेशीर व अवैधरित्या विक्री करीता साठवणुक करून, बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपीविरूध्द फिर्यादी अन्न सुरक्षा अधिकारी श्री. डॉ. ए. एन. खंदारे, वय ३८ वर्षे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पाचपावली येथे मपोउपनि. नुतन जाधव ८००७८९३६८४ यांनी आरोपीविरूध्द कलम १२३, २१४, २२३, २७४, २७५ भा.न्या.सं. सहकलम सहकलम ३(१)(zz)(v), २६(१), २६(२)(ii)(iv), २७(१)(३), ३०(२)(a), ५९ अन्न सुरक्षा मानके अधिनीयम २००६ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे.

**<u>३) पोलीस ठाणे कळमना :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

फिर्यादी राहुल जयचंद बत्रा, वय ४५ वर्षे, रा. प्लॉट नं. ५३०, जुना बगडगंज, बत्रा हाऊस, लकडगंज, नागपुर यांचे पोलीस ठाणे कळमना हद्दीत, प्लॉट नं. ८२, दालमिल रोड, चिखली येथे राहुल सिरॅमिक प्राय. लिमीटेड नावाचे टाईल्स सेनिटरी ॲण्ड सि.पि. फिटींग सामानाचे गोडावुन आहे. दिनांक २७.०५.२०२६ चे २०.३० वा. ते दिनांक २८.०५.२०२६ चे १०.३० वा. चे दरम्यान, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे गोडावुनचे दुसऱ्या मजल्यावरील छताचे टिन उचकवुन, आंत प्रवेश करून, गोडावुनमधील कृषी वापरातील वेगवेगळे एम. बि. मॉडेलचे टप, घरगुती वापरातील वेगवेगळे सि.जी. व एम.बि. मॉडेलचे टप असा एकुण किंमती ११,३९,७१०/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमना येथे पोउपनि. सौरभ बुनगे ९०२२१८५९१८ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे यशोधरानगर</u> :—** दिनांक ०१.०६.२०२६ चे १४.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत टिपु सुल्तान चौक, गरीब नवाज नगर, यशोधरानगर, नागपुर येथे राहणारे फिर्यादी यांचा भाचा नामे मोहम्मद सहात अहेमद वल्द मोहम्मद अर्शाद मोहम्मद, वय ०५ वर्षे हा फिर्यादीचे घरी गच्चीवर खेळत असतांना, त्याला ईलेक्ट्रीक वायरचा करंट लागल्याने तो बेशुध्द झाला. त्यास उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी मोहम्मद अहफाज मोहम्मद आबीद, वय ३० वर्षे यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे यशोधरानगर येथे मपोउपनि. स्वाती देशमुख ९३७३५३५३९१ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>१) पोलीस ठाणे बेलतरोडी</u> :—** श्रीमती लिना लक्ष्मण गेडाम, वय ६३ वर्षे, रा. प्लॉट नं. ७७, गुरूछाया, न्यु मनिष नगर, नागपूर ह्या दिनांक ३०.०५.२०२६ चे १७.०० वा. पासुन पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीतील राहते

घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग– गोरा, चेहरा– गोल, बांधा– मध्यम, उंची– ५ फुट १ इंच, केस– काळे पांढरे लांब, अंगात– हिरव्या रंगाची साडी व ब्लाऊज घातलेले आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात.

**२) पोलीस ठाणे नविन कामठी :–** कु. याशिका हरीष शाहु, वय २० वर्षे, रा. आनंद नगर, रामगड, कामठी, नागपूर ही दिनांक १०.०५.२०२६ चे ०४.०० वा. पासुन पोलीस ठाणे नविन कामठी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग– गोरा, चेहरा– गोल, बांधा– मध्यम, उंची– ५ फुट ४ इंच, केस– काळे लांब, अंगात– गुलाबी रंगाचा टि–शर्ट व निळ्या रंगाचा जिन्स पॅन्ट घातलेले आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलते.

**३) पोलीस ठाणे बेलतरोडी :–** कु. भाग्यलक्ष्मी व्यंकटेशराव पुलीगुच्चु, वय २१ वर्षे, रा. ४०१, लिली अपार्टमेंट, शिवलाईट टाऊनशिप, शंकरपुर, बेलतरोडी, नागपूर ही दिनांक २९.०५.२०२६ चे १७.०० वा. पासुन पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीतील राहते घरी सामान आणायला जाते असे सांगुन कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग– सावळा, चेहरा– लांबट, बांधा– सडपातळ, उंची– ५ फुट ४ इंच, केस– काळे लांब, डोळे काळे, अंगात– पांढऱ्या निळ्या रंगाचे ठिपके असलेला शर्ट व काळ्या रंगाचा लोवर पॅन्ट घातलेले आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलते. ओळख– डोळ्यावर चष्मा लावते.



श्रीमती लिना



कु. याशिका



कु. भाग्यलक्ष्मी

**(ईतर)**

**पोलीस ठाणे सदर हद्दीतील ''डाउन टाउन कॅफे'' पुढील ३० दिवसाकरिता बंद.**

पोलीस ठाणे सदर हद्दीत, माऊंट रोड सदर येथे हॉटेल सातबारा चे बाजुला ''डाउन टाउन कॅफे' सुरू होता. या आस्थापनेवर सदर पोलीसांनी वेळोवेळी छापे टाकले असुन, तेथे शासनाने दिलेल्या आदेश आणि अटी व शर्तीचे सतत उल्लंघन करीत, अवैधरित्या हुक्का पार्लर चालविले जात असल्याचे निष्पन्न झाले आहे. सिगारेट आणि इतर तंबाखु उत्पादने (जाहीरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम २००३ चे विविध कलमान्वये वारंवार गुन्हे दाखल करण्यात आले होते. जवळच्या कालावधीत दिनांक १३.०५.२०२६ रोजी ''डाउन टाउन कॅफे'' येथे ग्राहकांना तंबाखुयुक्त हुक्का बेकायदेशिरपणे पुरवुन चालवित असल्याने मिळुन आल्याने पो. ठाणे सदर येथे सिगारेट आणि इतर तंबाखु उत्पादने (जाहीरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम २००३ चे कलम ४(ए), २१(ए) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला होता. सदर पोलीसांनी जानेवारी २०२६ ते मे २०२६ पर्यत नमुद आस्थापनेवर छापे टाकुन ०४ गुन्हे नोंद केलेले आहेत.

''डाउन टाउन कॅफे'' आस्थापना धारक/चालक / मालक यांचेवर वारंवार पो. ठाणे सदर नागपूर येथे कायदेशिर कारवाई करून गुन्हे नोंद असतांना सुध्दा आस्थापना धारक हे सर्रासपणे आस्थापना सुरू ठेवुन

शासनाने दिलेल्या अटी व शर्तीचे वेळोवेळी उल्लंघन करून स्वत:चे आर्थिक फायदासाठी ग्राहकांना तंबाखुयुक्त हुक्का बेकायदेशिरपणे पुरवत असल्याचे आढळल्याने, मा. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परिमंळ क्र. ०२) नागपूर शहर यांनी दिनांक ०१.०६.२०२६ रोजी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता–२०२३ चे कलम १६३(२) मधील तरतुदीनुसार लोकहीत आणि सार्वजनिक शांतता राखण्यासाठी नमुद आस्थापनेवर प्रतिबंधात्मक कारवाई करणे आवश्यक असल्याने ''डाउन टाउन कॅफे'' आस्थापना ही पुढील ३० दिवससाठी पुर्णत: बंद ठेवण्याचे आदेश निर्गमित केले आहे.

**स्वा/–**

**( राहुल रोटे )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**